MHAM050018272022

# दिवाणी किरकोळ अर्ज क्र.६४१/२०२२ चे कामी नि. ०१ खालील आदेश

## (दिनांक १४.०३.२०२३)

अर्जदार यांनी मुंबई नियमन कायदा VIII १८२७, कलम २ प्रमाणे वारसा दाखल मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

२. अर्जदारचे कथन की, मयत **एकनाथ नारायण रवाळे** हा अर्जदार क्र.१ चा पती असून अर्जदार क्र.२ व ३ चे वडील आहे. मयत **एकनाथ नारायण रवाळे** हे दिनांक **१६.१२.२०२०** रोजी मयत झालेले आहे. अर्जदार यांना प्रशासकीय व औपचारीक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत **एकनाथ नारायण रवाळे** यांना अर्जदार यांचे शिवाय अन्य कोणीही सरळ व कायदेशीर वारस नव्हते व नाहीत. अर्जदार हे मयत **एकनाथ नारायण रवाळे** यांना सरळ व कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे मयत **एकनाथ नारायण रवाळे** यांना अर्जदार क्र.१ ते ३ हे वारस असलेबाबत वारसा दाखला मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. त्या अनुषंगाने जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. मात्र दि.२४.०१.२०२३ रोजी व वर्तमानपत्रात जाहीत नोटीस देऊन देखील या अर्जाला आव्हान देण्यासाठी कोणीही समोर आले नाही.

४. अर्जदार क्र.२ दिपक याने नि.क्र.०८ कडे स्वतःचे शपथपत्र दाखल केले आहे. त्याने स्वतःच्या कथनाच्या पुष्ठर्थ नि.क्र.०९ कडे त्याचे वडील **एकनाथ**

**नारायण रवाळे** यांचा मृत्यु दाखला, नि.क्र.१० ते १२ कडे आधार कार्डाच्या पडताळणी केलेल्या प्रती इत्यादी कागदपत्र दाखल केलेली आहेत. त्याने अर्जातील कथनांना शपथेवर पुष्ठी दिलेली आहे. त्याने अर्जातील कथनांचा शपथेवर पुनरुच्चार केलेला आहे. वरील सर्व शपथपत्रातील मजकुराला आव्हान देण्यासाठी याकामी जाहीर नोटीस लागूनही कोणीही पुढे आलेले नाही. त्यामुळे वरील शपथपत्रातील कथने अबादीत राहिलेली आहेत. त्यामुळे वरील कागदोपत्री पुरावा पाहता याकामी अर्जदार हे मयत इसमाचे सरळ व कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत आहे.

५. एकंदरीत पाहता याकामी जाहीरनामा नि.क.१३ प्रसिद्ध होऊन देखील अर्जदारांच्या अर्जाला विरोध करण्यास कोणीही पुढे आलेले नाही. सबब, अर्ज मंजुर करणे योग्य व न्याय राहिल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

**१)** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२)** अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत **एकनाथ नारायण रवाळे** यांचे सरळ व कायदेशीर वारस असल्याबाबत वारसा प्रमाणपत्र देण्यात यावे.

**३)** आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर अर्जदार यांचे नावे वारसा प्रमाणपत्र देणेत यावे.

(खुल्या न्यायालयात अधिघोषित)

Digitally signed by RAJENDRA DINAKAR CHOUGALE
Date: 2023.03.14 17:37:47 +0530

अचलपुर
दिनांक– १४/०३/२०२३.

**(राजेंद्र दि. चौगले)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश,
(क.स्तर), अचलपुर.